आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
- नॉन क्रिमिलेयर मर्यादा ८ लाखांवरुन १५ लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा राज्य सरकारचा निर्णय /शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळं स्थापन करणार
- भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणामुळे आसियान देशांमधल्या परस्पर संबंधांना नवी ऊर्जा, गती आणि दिशा मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

  **आणि**

- ज्ञानराधा बहुराज्यीय सहकारी पत संस्था लिमिटेड आणि इतरांच्या १ हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या स्थावर मालमत्तेवर ईडीची टाच

**<><><><><>**

ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी वरळी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी उपस्थित होते. टाटा यांचं काल रात्री मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झालं होतं. ते ८६ वर्षांचे होते.

आज सकाळी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी एनसीपीए इथं ठेवण्यात आलं होतं. राजकीय, औद्योगिक आणि इतर क्षेत्रांमधल्या नेते, तसंच विविध देशांचे राजदूत यांनी रतन टाटा यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांच्यासह इतर नेते, उद्योजक, अभिनेते, खेळाडू, तसंच देश-विदेशातल्या मान्यवरांनी दुःख व्यक्त करत,

त्यांना आदरांजली वाहिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले…

**होल्ड- बाईट - मुख्यमंत्री**

रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही मंत्रीमंडळानं संमत केला.

**<><><><><>**

रतन टाटा यांच्या निधनाबद्दल देश-विदेशातल्या मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनानं राष्ट्र निर्माणाला कार्पोरेट विकास आणि नैतिकतेची उत्कृष्ट जोड देणारं व्यक्तीमत्व हरपलं आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली वाहिली. भव्य स्वप्नं पाहण्याची आणि समाज ऋण फेडण्याची त्यांची तळमळ अद्वितीय होती, या शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रतन टाटा यांना आदरांजली वाहिली आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. याशिवाय भाजपाचे जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी, माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, मनसे प्रमुख राज ठाकरे, ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, उद्योजक अनिल अग्रवाल, गौतम अदानी, आनंद महिंद्रा, सुंदर पिचाई, टाटा यांनी शिक्षण घेतलेलं कोर्नेल विद्यापीठ यांनीही रतन टाटा यांना आदरांजली वाहिली आहे.

टाटा यांनी व्यापार आणि परोपकारात आपली अमिट छाप सोडली असल्याचं कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऐकूया रतन टाटा यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा संक्षिप्त आलेख…

***व्हाइस कास्ट***

*न्यूयॉर्कमधल्या कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चरमधली पदवी पूर्ण केल्यानंतर १९६२ मध्ये रतन नवल टाटा, टाटा समुहात रूजू झाले. त्यानंतर १९७५ त्यांनी हॉवर्ड बिझनेस स्कूलमधून व्यवस्थापन विषयातलं शिक्षण पूर्ण केलं. टाटा समुहातल्या अनेक कंपन्यांमध्ये काम केल्यावर १९७१मध्ये National Radio & Electronics Company Limited कंपनीचं प्रभारी संचालकपद दिलं गेलं. १९८१ मध्ये ते टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष झाले. १९९१ पासून २८ डिसेंबर २०१२ पर्यंत ते टाटा सन्सचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात समुहाचा महसूल कित्येक पटीनं वाढला आणि २०११-१२ मध्ये १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे गेला. रतन टाटा यांच्याच नेतृत्त्वाखाली टाटा मोटर्सनं प्रवासी वाहन क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर नॅनो ही गाडी बाजारात आणली आणि जग्वार लँड रोव्हर ही ब्रिटीश कंपनी विकत केली. रतन टाटा यांच्या मार्गदर्शनात टाटा स्टीलनं कोरस, टाटा समुहानं VSNL, टाटा टी नं टेटली हा ब्रिटीश समूह अधिग्रहित केला. २०२१ मध्ये एअर इंडियाच्या बोलीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर रतन टाटा यांना खूपच आनंद झाला होता. जेआरडी टाटा आज आपल्यात असते तर त्यांचा आनंद गगनात मावला नसता, अशी प्रतिक्रिया रतन टाटा यांनी दिली होती. सेवानिवृत्तीनंतर रतन टाटा यांना टाटा सन्ससह इतर अनेक कंपन्यांचं मानद अध्यक्षपद दिलं गेलं होतं. टाटा समुहातल्या इतर सदस्यांप्रमाणे, त्यांनीही सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिलं. शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रातल्या त्यांच्या कामाचा कोट्यवधी लोकांच्या आयुष्यावर दीर्घ परिणाम दिसून येतो आहे. प्राणी, विशेषतः भटके कुत्रे आणि*

*मांजरांची त्यांना विशेष काळजी होती. नुकतचं त्यांनी टाटा ट्रस्टकडून मुंबईत प्राण्यांसाठीचं रुग्णालय सुरू केलं होतं. वातावरण बदलासाठी कार्यरत असलेल्या इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्हचे ते संस्थापक होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मुंबईकरांना मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. केंद्र सरकारनं २००८ मध्ये त्यांना पद्मविभुषण देऊन गौरवलं होतं. गेल्याच वर्षी राज्य सरकारनं पहिला उद्योग रत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार*

**<><><><><>**

राज्य सरकारनं आज नॉन क्रिमिलेयर मर्यादा ८ लाखांवरुन १५ लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा निर्णय घेतला. शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाज, पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महामंडळं स्थापन करण्याचा निर्णयही राज्य मंत्रीमंडळानं आज घेतला. मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात, तसंच मदरश्यांमधल्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करायलाही राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. राज्यातल्या ३४५ अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरं सुरू करणं, आपले सरकार केंद्र चालकांना दरमहा १० हजार रुपये मानधन, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापन करायलाही मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमात सुधारणा करणं, ५७ सार्वजनिक रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालयांची सुविधा करणं, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणुकीला मुदतवाढ द्यायला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा, वांद्◌्रयातल्या सरकारी

निवासस्थानातल्या शासकीय कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवणं, केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राबवणं यासारखे अन्य काही निर्णयही आज राज्य मंत्रीमडळाच्या बैठकीत झाले. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला राज्य सरकारनं वैधानिक दर्जा दिला.

<><><><><>

भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणामुळे आसियान देशांमधल्या परस्पर संबंधांना नवी ऊर्जा, गती आणि दिशा दिली आहे, २१ वं शतक हे भारत आणि आसियान देशांचं शतक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. लाओस मधल्या व्हिएंतियान इथं भारत-आसियान शिखर परिषदेला ते संबोधित करत होते. भारत आणि आसियान देश हे शांतताप्रिय देश असून एकमेकांच्या सर्वभौमत्व आणि राष्ट्रीय एकात्मतेचा आदर करतात, जगाच्या इतर भागातले देश संघर्ष आणि तणावात असताना भारत आणि आसियान देशांमधली मैत्री, सहकार्य, संवाद आणि भागीदारी अत्यंत महत्वाची आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. आसियान प्रदेशातला व्यापार मागच्या दहा वर्षांत दुप्पट झाला असून १३० अब्ज डॉलरवर पोहोचल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. भारतातून सातही आसियान देशांमध्ये जायला थेट विमानसेवा असून लवकरच भारत ते ब्रुनेई विमानसेवा सुरू होईल, असंही प्रधानमंत्री म्हणाले.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी व्हिएंतियान इथं पोहोचल्यानंतर लाओसचे गृहमंत्री विलाव्योंग बौद्दखम यांनी स्वागत केलं. तसंच भारतीय वंशाच्या नागरिकांनीही प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. त्यानंतर स्थानिक कलाकारांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासमोर लाओ रामायण म्हणजे फलक फलम सादर केलं. हे रामायण या महाकाव्याचं लाओ रुपांतर आहे. त्यानंतर सेंट्रल बुद्धिस्ट फेलोशिप ऑर्गनायजेशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री सहभागी झाले होते.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयानं ज्ञानराधा बहुराज्यीय सहकारी पत संस्था लिमिटेड आणि इतरांची सुमारे १ हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या स्थावर मालमत्तेवर टाच आणली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेत मुंबई, छत्रपती संभाजी नगर, बीड आणि जालना जिल्ह्यातल्या इमारती आणि जमिनींचा समावेश आहे. या कंपनीविरोधात राज्यातल्या अनेक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या आधारे ईडीनं हा तपास सुरु केला होता. या कंपनीनं जास्त परतावा देण्याचं अमिश दाखवून ४ लाखांहून अधिक गुंतवणूकदारांना गंडा घातल्याचं या तपासात निष्पन्न झालं आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्राच्या वतीनं स्वास्थ्य की पाठशाला हा विशेष कार्यक्रम आज आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत पूजा शिंदे यांनी आरोग्य प्रशिक्षक रोहित शिंदे यांची मुलाखत घेतली. तसंच मोफत आरोग्य शिबिराचंही आयोजन यावेळी करण्यात आलं. आकाशवाणी वृत्त विभागासह सर्व विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यात उत्साहाने भाग घेतला.

**<><><><><>**

राज्यात उद्या कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.